॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० :- कवयित्री बहिणाचाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा व विभाग समन्वयक यांची रासेयो उपक्रम नियोजन व आयोजन संदर्भात सहविचार सभा सोमवार दि.१३/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन येथे आयोजित करण्यात आली. या सभेत कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील व रा.से.यो. संचालक प्रा.व्ही.एम. रोकडे यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हा-विभागीय रासेयो समन्वयक यांच्या सहविचार सभेत शासन निर्देशानुसार रासेयो निमित उपक्रम व विशेष शिबीर कार्यक्रम आयोजन, चान्सलर ब्रीगेड, राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर, आव्हान-२०२६ संघ सहभाग, रासेयो एककांमध्ये विशेष शिबीरांना भेटी देणे व नियमित उपक्रमाचे अहवाल सादर करणे, उपक्रम व विशेष शिबीर केंद्रीय पध्दतीने लेखा परिक्षण सादर करणे, अध्यादेश १६३ प्रोत्साहनपर गुणदान इत्यादी बाबत रासेयो एककांचे कार्यक्रम अधिकारी यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात विचार विनिमय करण्यात आला.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० :- चान्सलर ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर आव्हान २०२६ चे आयोजन डॉ. पंजाबराय देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे दि. १७ ते २४ जानेवारी, २०२६ या दरम्यान करण्यात आले आहे. चान्सलर ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर आव्हान २०२६ मध्ये जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील प्रत्येकी २५ स्वंयसेवक (१५ पुरुष १० महिला) तसेच प्रत्येक जिल्हा संघाकरीता कार्यक्रम अधिकारी असे एकूण ७७ व्यक्तींचा संघास दे.ना. भोळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भुसावळ येथुन तिन्ही जिल्हयातील संघाना एकत्रीत करुन कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. व्हि. एम. रोकडे संचालक राष्ट्रीय सेवा योजना, प्राचार्य राजू फालक, यांनी संघास शुभेच्छा दिल्या . मा. कुलसचिव महोदय यांनी रासेयो स्वयंसेवकांचे कर्तव्य आणि जबाबदारी या विषयी मार्गदर्शन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २० जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता